
स्नेहबंध
महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट
एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ
दिवाळी विशेषांक
नोव्हेंबर २०२६
वाड्याच्या ओसरीवरचा तोच ओळखीचा सुवास,
परदेशी बर्फावर पसरतोय प्रकाशाचा आभास...
अंतर कितीही असले तरी क्षणात पार करुन जाई,
दोन घरांना जोडणारा हा एकच तेजस्वी विश्वास.
मातीची प्रत्येक पणती अन् उबदार तिची ज्योत,
आठवणींचा मनात वाहतोय मखमली स्त्रोत...
सातसमुद्रापारही घरपण तेवत राहते,
जेव्हा संस्कृतीची प्रकाशधारा काळजात वाहत राहते!
" आपले मंडळ "
|| Maharashtra Mandal of Detroit ||
Est. 1977

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



With Best Wishes from

The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

अनुक्रमणिका

अनु.क्र.	लेख / कविता - नाव	लेखक / कवी	पृष्ठ क्र.
१	Journey... 49 NOT OUT!	Mansi Dahanukar	४
२	बादलीयादी	ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर	६
३	आळूच्या गाठया	आदित्य दांडेकर	८
४	पानगळ : चित्रकाराच्या नजरेतून	योगेश औधकर	१०
५	गीतांजली एक अनुभूती...	सौ अंजली कुलकर्णी	१२
६	जीवनाचा गंध हा, विश्रांत हा, शांत हा...	बागेश्री नाईक	१४
७	एक दिवाळी अशीही	अभिजित जोगदेव	१६
८	The Whisper	Reghu Neelakanthan	२२
९	कृष्णा	शमा सुखटणकर	२६
१०	Visit to BASF Kids' Lab in Yeola, India	Anvita Walekar. Youth Committee	२९
११	Discovering Inner Harmony	Anju Vale	३४
१२	TROY MARATHI SHALA	Various Artists	३८
१३	CANTON MARATHI SHALA	Various Artists	४०
१४	PALAV: Giving Newborns a Stronger Start	Nitin Chouthai	४३

संपादक

स्नेहा विपट

मुखपृष्ठ, रचना व मांडणी

देवेंद्र चितळे

स्नेहबंध समिती

देवदत्त कुलकर्णी **बागेश्री नाईक** **प्राची चितळे**

लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

Journey... 49 NOT OUT!

सुरुवात झाली काही अनोळखी माणसांनी,
आणि बघता बघता नाती जुळली आठवणींनी!
कधी planning, कधी panic, कधी last-minute धावपळ,
कधी हसणं, कधी रुसणं, कधी नुसताच गोंधळ!
चर्चा काही संपत नाही!



Opening time, Closing time – कशाचीही खात्री नाही!
कार्यक्रमाच्या तारखा आता आठवतही नाहीत,
पण पुढच्या meetings काही थांबत नाहीत!
कधी "Who's bringing water?"
कधी "Tables कोण मांडणार?"
आणि शेवटी तोच प्रश्न – "हे सगळं कोण आवरणार?"
कधी stage सजवले, कधी जेवण वाढलं,
कधी पडद्यामागे राहून सगळं सांभाळलं!



Typos झाल्या unlimited,
पण भावना पोहोचल्या guaranteed,
लोक म्हणाले, "भावना समजल्या...
आता spell check तेवढं needed
प्रत्येकाने आणली energy, प्रत्येकाने दिलं हसू,
समोरच्यांच्या चेहऱ्यावर तेच उमटलं जणू!
येणाऱ्यांचं हसत स्वागत केलं,
ढोलाच्या ठेक्यावर सारं वातावरण दुमदुमलं!
शब्दांतून आठवणींचं सुंदर जग सजवलं,
नव्या पिढीच्या जोशाने भविष्य उजळवलं!
रंग, कल्पना आणि शब्दांनी उत्सुकता वाढवली,
आणि साऱ्यांच्या मेहनतीने प्रत्येक मैफल गाजवली!
Stress होता, workload होता, तरी थांबलो नाही,
कारण लोकांच्या आनंदापुढे दुसरं यश काही नाही!
कधी मतं जुळली, कधी नाही,
कधी वाटलं, "बस्स, आता पुन्हा नाही!"
पण पुढचा कार्यक्रम आला की,
"चल, करुया!" म्हणायला उशीर झाला नाही!

Some came as volunteers,
Some became friends...
And somewhere along the way,
We became family.
ना पैशांसाठी, ना प्रसिद्धीसाठी,
फक्त आपल्या माणसांसाठी, आपल्या मंडळासाठी.
We didn't just organize events, We created moments.
We didn't just spend time, We made memories.
आज मागे वळून पाहताना,
किती चेहरे, किती किस्से आठवतात...
ते हसरे क्षण, ती धावपळ, नकळत डोळ्यांच्या कडा ओलावतात.

कल फिर अपनी-अपनी राहों पर चल देंगे,
इन भागदौड़ भरे दिनों को शायद तरसेंगे...
ना वो deadlines होंगी, ना वो late-night calls,
ना वो "कौन करेगा?" वाले WhatsApp walls!
आने वाले दिन कितने सूने, कितने बेमाने होते,
अगर यादों में ये दिन सुहाने न होते...
और ये सफ़र इतना सुहाना न होता, अगर साथ तुम्हारा न होता!

49 NOT OUT | MMD 2026
The innings may end, but the memories stay NOT OUT.

Mansi Dahanukar
President 2026



बादलीयादी

“There is a Hole in my Bucket!”

तीनशे वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका जर्मन गाण्यावर आधारित एक छान बडबडगीत आहे. छोटा हेन्री आपल्या बहिणीकडे तक्रार करतो; ‘अगं लायझा, माझ्या बादलीला भोक पडलंय'. लायझा त्याला सांगते की मग ती स्ट्रॉ घेऊन दुरुस्त कर.
त्यावर तो अजून एक सबब सांगतो, मग ती म्हणते, अरे सुरीने ती काप! दोघे असंच पुढेमागे करत राहतात. तिच्या प्रत्येक सूचनेला फेटाळायला हेन्री कारणं देत राहतो आणि स्ट्रॉ, सुरी करत करत गाडी पाण्यावर येते. ती सांगते पाणी वापर, तो म्हणतो पण मी पाणी आणू कसं? लायझा म्हणते, अरे बादलीने .....अगं पण माझ्या बादलीला भोक पडलंय!

मी गिरगावकर असल्याने गळक्या बादलीचं दु:ख लगेच भिडलं. पाणी आलं पण बादलीच गळकी असली तर काय करायचं? माझी तीच तर कैफियत आहे ... बादलीच गळकी आहे! सांगते कशी ते.

मला लहान असताना सोन्याच्या दागिन्यांची खूप हौस होती. 'गोठतोडे घालू आपण नटूश्श' हे गाणं मंगळागौरीला ऐकलं की मी (चष्मा सावरत सावरत) स्वत:चं ध्यान डोळ्यापुढे आणायचे. मग ठरवलं की मोठी होईन तेंव्हा माझ्याजवळ २०० ग्रॅम (साधारणत: २० तोळे) सोनं असायला पाहिजे. या स्वप्नातच मी दहावी झाले, आईने ११ ग्रॅमचा लक्ष्मीहार केला आणि सांगितलं की आता फक्त १८९ ग्रॅम राहिले! परवा खण आवरताना माझ्या स्त्रीधनाचा अंदाज घेतला. खरं आणि खोटं सोनं मिळून सुद्धा २० तोळे झाले नाहीत! आईवडिलानी सालंकृत कन्यादान केलं आणि सासूसासऱ्यांनी हौसेने उरलेले दागिने केले तरी!

मी मैत्रिणीला म्हंटलं, बघ गं, बकेट लिस्टमधली एक गोष्ट परवडते आहे तरी पूर्ण नाही झाली! “काहीही काय ज्योत्स्ना, बकेटमध्ये लोकं व्हेनिसला जाईन, एव्हरेस्ट चढेन अशा कठीण गोष्टी टाकतात; २० तोळे सोनं ही त्या पंक्तीत जाऊन नाही बसणार.” असहमत!!

नवव्या वर्षी कानात सोन्याची सुंकली घालून चाळीत वाढणाऱ्या मला '२०० ग्रॅम सोनं' हे असाध्य ध्येयच वाटत होतं! मुद्दा तो नाही, मुद्दा हा की मी जमत, परवडत असूनही उरलेले तोळे मी घेतले नाहीत, कारण साध्य होत आल्यावर ते ध्येय मी विसरुन गेले होते.

माझी बादली .... गळकी आहे! ते तेव्हां आणि हे आता!

काही वर्षांपूर्वी मी अर्धी मॅरेथॉन धावायचं ठरवलं. जोडीला एक मैत्रीण होती. १३.१ मैल गाठण्याचा क्षण १० दिवसांवर आला आणि आमच्या लक्षात आले की आम्ही अजून लांबचा पल्ला गाठलाच नाही. मग एक दिवस १२ मैल “धालायचं” (आमची पद्धत धावणं (१०%) + चालणं (६०%) + धापा टाकणं(३०%) = धालणं) ठरवलं. शेवटचे २ मैल उरले असताना दम निघून गेला. हाय हुई झालं तर मैत्रीण म्हणाली, काहीतरी चांगलं सांग ना म्हणजे आपण नव्या दमाने पुढे जाऊ. तिला मी 'जोर लगा के हैश्शा' किंवा 'साथी हाथ बढाना' म्हणेन ही अपेक्षा.

मी म्हंटलं, जमलं तर धावू नाही तर काय माझ्या फोनवर उबर आहेच की! माझा हा ‘पलायन’वाद ऐकून मैत्रिणीने (मनातल्या मनात) शिवी हासडली आणि माझा नाद सोडून ती पुढे धावली.

त्यांनतर मी लागोपाठ ३ वर्षं अशा अर्ध्या मॅरेथॉन धावले. मग वाटलं चला आता एक अक्खी करुन बघूया, टाकला मनसुबा बादलीत. एके वर्षी मनाचा हिय्या करुन पैसे भरले आणि थंडी कमी झाल्यावर पुन्हा एकदा धावूया असे ठरवले. जूनमध्ये शर्यतीच्या संचालकांनी जाहीर केलं, कोविड मुळे शर्यत रद्द. हवं तर 'व्हर्चुअल' करा नाही तर पैसे परत घ्या! बादली गळली, मॅरेथॉन टळली!

या बादलीला भोक पडायचं एक कारण म्हणजे त्यात कोणीही काहीही भरतं! माझ्या आप्तेष्टांच्यात काही लोक असे आहेत, मी जर का 'आज ६च्या ऐवजी साडेपाचला उठले' असं सांगितलं तरी कौतुक करतील, तर काही असे आहेत की ज्यांना मी खरोखर एव्हरेस्ट चढले असं सांगितले तर म्हणतील. त्यात काय, हल्ली अनेक जण चढतात! त्या दोन्ही गटांकडे मी दुर्लक्ष करु शकते पण मधल्या फळीला मात्र माझ्याकडून खूप अपेक्षा असाव्यात. त्या अपेक्षांचा आयाम "तू पौरोहित्य का नाही शिकत?" पासून "तू गोल्फ खेळायला जात जा' पर्यंत असतो!



दहावी झाल्यावर पुढे काय या प्रश्नाची माईणकरांच्या(माहेर) प्रथेनुसार जाहीर चर्चा झाली. कॉलेजची पायरी देखील न चढलेल्या एका आप्तांच्या मते मी बायोलॉजी घ्यावं. ("दादा, तू जोबीला डॉक्टर कर, आपल्या घरात एक तरी डॉक्टर असावी!") अनेक कॉलेजात शिकवलेल्या दादांनी (माझ्या वडिलांनी) ते ऐकलं आणि मला मनाविरुद्ध 'बायॉलॉजी' घ्यायला लावलं. माझ्या बादलीत बाकीचे सगळे आपली स्वप्न घालत होते. मी बरीच झगडले - बायॉलॉजीशी. ("दादा, जोबी डॉक्टर झाली नाही!"). भरणाऱ्याचे हात हजार अन् गळकी माझी बादली!

गळेना का बादली! कारण मेख अशी की त्यामुळे बादली कायम हलकी, तिचं ओझं हाताला जाणवत नाही आणि जगण्यालाही! आपण आपलं 'धालते रहो '.

ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर

आळूच्या गाठया

संदर्भ: आळूच्या गाठया ही एक पंचकळशी (सोमवंशिय क्षत्रिय पाठरे) समुदायाची पारंपरिक पाककृती आहे.

साहित्य :

- ✓ अळूची पाने (३ -४)
- ✓ १/२ वाटी चणा डाळ (रात्रभर भिजवावी)
- ✓ १५० ग्राम कोळंबी
- ✓ १ लहान कांदा
- ✓ १ वाटी ओल खोबरं
- ✓ १ चमचा जीरे
- ✓ अख्खे मिरे
- ✓ ८-९ लसणाच्या पाकळ्या
- ✓ तेल
- ✓ हिंग
- ✓ १ आल्याचा तुकडा
- ✓ कोथिंबीर
- ✓ हिरवी मिरची (चवीनुसार)
- ✓ चिंचेचा कोळ (चवीनुसार)
- ✓ १/२ चमचा चण्याचे पीठ
- ✓ १ चमचा हळद
- ✓ लाल तिखट (चवीनुसार)
- ✓ गरम मसाला (चवीनुसार)
- ✓ मीठ



कृती :

- वाटण: आलं, ३-४ लसणाच्या पाकळ्या, हिरवी मिरची, कोथिंबीर, १/२ वाटी ओल खोबरं.
- गाठया: अळूच्या पानाचे तुकडे करुन घेणे. मोठ्या पानाचे ४ तर मध्यम आकाराच्या पानाचे २ तुकडे करावे. थोडं ओल खोबरं, २-३ भिजवलेली चणाडाळीचे दाणे, १ मीरी, पानाच्या तुकड्या मध्ये भरावे व पानाची पुडी बांधावी. पुडी बंधण्यासाठी अळूच्या देठीची शिर वापरावी.
- कोळंबीला मीठ, आलं-लसूण पेस्ट, हळद, लाल तिखट लावून मॅरीनेट करणे.
- भांड्यात तेल घेऊन त्यात हिंग, जीरे व ठेचलेला लसूण टाकून फोडणी दयावी. लसूण गुलाबी झाल्यावर त्यात चिरलेला कांदा घालून, कांदा गुलाबी परतावा.
- त्यात अळूच्या बांधलेल्या गाठया आणि कोळंबी टाकून मंद आचेवर झाकण देऊन शिजवावे.
- गाठया मऊ झाल्यावर त्यात वरील वाटण घालावे, आवश्यकतेनुसार पाणी घालावे.
- चवीनुसार मीठ, हळद, लाल तिखट, गरम मसाला, चवीनुसार गुळ घालून शिजवून घेणे.
- शिजल्यावर त्यात चवीनुसार चिंचेचा कोळ व चण्याचे पीठ लावावे.
- शाकाहारी: कोळंबी एवजी काजू किवा शेंगदाणे वापरावे.

आदित्य दांडेकर



Happy Diwali

Best Wishes
from
Prabhakar Patil & Family

पानगळ : चित्रकाराच्या नजरेतून

भारतातील विविध सण आणि उत्सवांमुळे ऋतूंची जाणीव आपल्याला सहज होत असते. श्रावणातील व्रतवैकल्ये, भाद्रपदातील गणेशोत्सव, आषाढातील पंढरपूरची वारी आणि अश्विन महिन्यातील दिवाळीची चाहूल घेत आपण वर्षभरातील ऋतूंचा प्रवास करत असतो. अमेरिकेत मात्र इंग्रजी कॅलेंडरवरील महिने बदलताना दिसतात आणि निसर्ग आपल्या रंगांतून ऋतू बदलल्याची जाणीव करुन देतो.



मिशिगनमध्ये ऑक्टोबर आणि नोव्हेंबर हे महिने म्हणजे निसर्गाच्या रंगपेटीतील जवळजवळ सर्वच रंग वापरण्याचा मोह होणारा काळ! हिरव्या पानांची जागा हळूहळू पिवळ्या, केशरी, लाल आणि तपकिरी रंगांच्या असंख्य छटा घेतात. झाडांच्या फांद्यांतून डोकावणारे निळे आकाश, जमिनीवर पसरलेला पानांचा गालिचा आणि हवेत जाणवणारी थंडीची चाहूल–हे सारे अनुभवताना माझ्यासमोर जणू निसर्गाने स्वतः रंगवलेले एक भव्य चित्र उभे राहते. माझ्यासारख्या मुक्त कलाकाराला या ऋतूची दरवर्षी आतुरतेने वाट पाहायला लावणारे हेच त्याचे वैशिष्ट्य!

मी भारतात अनेकदा कोकणात फिरण्यासाठी आणि आर्ट कॅम्पसाठी गेलो आहे. कोकण म्हणजे हिरवाईने नटलेला प्रदेश. नारळी-पोफळीच्या बागांमध्ये हरवलेली गावे, गेरु रंगाची कौलारु घरे आणि दूरवर पसरलेला समुद्र मनाला भारावून टाकतो. चित्रकारांसाठी समुद्र म्हणजे जणू एक विशाल कॅनव्हासच! सूर्योदयापूर्वीचा, दुपारचा आणि सूर्यास्ताच्या वेळचा समुद्र एकच असला, तरी प्रत्येक वेळी त्याचे रंग, प्रकाश आणि भाव वेगळे असतात. ते रंग कागदावर उतरवताना चित्रकाराचे कौशल्य पणाला लागते.

उत्तर अमेरिकेत आल्यावर मिशिगनसारख्या राज्यात निसर्गाचे वेगळेच रुप अनुभवायला मिळते. विशाल सरोवरे, छोटी गावे, शहरांच्या आसपासची हिरवाई आणि राखीव स्टेट पार्क्स चित्रकारांना सतत खुणावत असतात. येथे प्रत्येक ऋतू आपले स्वतंत्र रंग घेऊन येतो; मात्र पानगळ या रंगांच्या उधळणीमुळे विशेष लक्ष वेधून घेते.

चित्रकार म्हणून एखाद्या दृश्याकडे पाहताना माझे लक्ष केवळ त्याच्या रंगांकडे जात नाही. प्रकाश कुठून येतो, सावल्या कुठे पडतात, कोणता रंग उठून दिसतो आणि कोणता रंग पार्श्वभूमीत मिसळतो, याचेही निरीक्षण मी करतो. चित्ररचनेत परस्परविरोधी घटक एकत्र आल्याने चित्र अधिक प्रभावी होते. ठळक ब्रश स्ट्रोक्स आणि बारीक रेषा, गडद आणि फिकट रंगछटा, तसेच उबदार आणि शीत रंग यांचा योग्य मेळ चित्राला वेगळीच खोली देतो.

उदाहरणार्थ, पानगळीच्या काळात दिसणारे पिवळे, केशरी आणि लाल हे उबदार रंग निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर अधिक उठून दिसतात. काही ठिकाणी दिसणाऱ्या निळसर-जांभळ्या सावल्या या रंगसंगतीला आणखी आकर्षक बनवतात. झाडांचे गडद खोड, पानांमधून डोकावणारे आकाश आणि जमिनीवर पडलेल्या पानांचे रंग यांमुळे निसर्गातच एक सुंदर चित्ररचना तयार झालेली असते. जवळच्या झाडांचे तपशील आणि दूरवरच्या झाडांचे धूसर आकार यांतील फरक दृश्याला खोली देतो.



वॉटरकलरमध्ये हे सारे कागदावर उतरवणे हे एक वेगळेच आव्हान असते. पाण्याचे प्रमाण, रंगाची पारदर्शकता, ब्रशचा स्पर्श आणि कागदावर सोडलेली मोकळी जागा या प्रत्येक गोष्टीला महत्त्व असते. प्रत्येक पानाचा तपशील रंगवण्यापेक्षा त्या झाडाचा एकंदर रंगसमूह, प्रकाश आणि वातावरण पकडणे अधिक महत्त्वाचे ठरते. कधी दोन-चार मोकळे ब्रश स्ट्रोक संपूर्ण दृश्याचा भाव व्यक्त करतात, तर कधी एखादी बारीक रेषा चित्राला आवश्यक असलेला तपशील देते. निसर्गाची हुबेहूब नक्कल करण्यापेक्षा त्याने मनावर उमटवलेला अनुभव रंग आणि रेषांमधून व्यक्त करणे, हेच चित्रकलेचे खरे सौंदर्य आहे.

चित्रकार म्हणून मी निसर्गाकडून रंग शिकतो; पण पानगळ मला रंगांपलीकडे पाहायलाही शिकवते.माझ्यासाठी पानगळ म्हणजे निसर्गाने मुक्तहस्ते उधळलेली रंगपंचमी. प्रत्येक पान एक स्वतंत्र रंगछटा, प्रत्येक झाड एक वेगळी चित्ररचना आणि संपूर्ण ऋतू म्हणजे निसर्गाने साकारलेले एक भव्य लँडस्केप!

योगेश औंधकर

गीतांजली एक अनुभूती...


तो-
खूप अंत:स्थ गाभ्यातला
त्याच्या खोल अदृश्य स्पर्शाने
माझं अस्तित्व जागवणारा...

तो-
माझ्या डोळ्यांवर त्याची मोहिनी टाकणारा,
आत्यंतिक आनंदाने सुखदु:खाच्या तालावर
माझ्या हृदयाच्या तारा झंकारणारा...

तो-
क्षणोक्षणी बदलणाऱ्या नीलहरित वर्णात
सोनेरी-चंदेरी मायेचे जाळे विणणारा...

त्याच्या
ज्या चरणस्पर्शाचा मला विसर पडला आहे,
त्या त्याच्या चरणांकडे मला पाहू दे...
दिवस येतात, युगे सरतात आणि-

तो-
अनेक नावांनी, अनेक रुपांनी, अनेक वेषांनी
अनेकदा आत्यंतिक सुखाने आणि
दु:खाने माझं हृदय हेलावतो...



HE it is, the innermost one, who awakens
my being with his deep hidden touches.

He it is who puts his enchantment upon these
eyes and joyfully plays on the chords of my
heart in varied cadence of pleasure and pain.

He it is who weaves the web of this maya in
evanescent hues of gold and silver, blue and
green, and lets peep out through the folds of
his feet, at whose touch I forget myself.

Days come and ages pass, and it is ever he who
moves my heart in many a name, in many a
guise, in many a rapture of joy and of sorrow

सौ अंजली कुलकर्णी

GKR and Associates, P.C.

Tax and Accounting Firm

Raj Grewal, CPA



OUR SERVICES:

- Tax and Accounting for individuals and small businesses

info@gkrcpa.com

734-658-8334

https://www.gkrcpa.com

Partner with us to create additional income and build wealth

We are expanding our team, call us to find out more!

Best Wishes from Pradeep Kokate & Sharayu Dalvi



जीवनाचा गंध हा, विश्रांत हा, शांत हा...

काही गाणी ही ऐकण्यासाठी नसतात, तर ती अनुभवण्यासाठी असतात... काही शब्द ओठांवर रेंगाळत नाहीत, तर थेट मनाच्या कोपऱ्यात घर करुन जातात. "जीवनाचा गंध हा, विश्रांत हा, शांत हा..." या ओळी ऐकताना मन नकळत एका शांत, प्रसन्न विश्वात हरवून जातं. विचारांची गर्दी हळूहळू विरळ होते आणि मनाला जाणवतो तो एक अनामिक आनंद... जणू काही आयुष्याच्या धावपळीत स्वतःचा च स्वतःशीच हरवलेला संवाद पुन्हा एकदा सापडतो..

जीवनाचा खरा गंध कशात असतो? तो मोठ्या यशात, संपत्तीत किंवा प्रसिद्धीत नसतो. तर तो असतो आईच्या कुशीत, बाबांच्या मायेच्या स्पर्शात, मित्र मैत्रिणींच्या निरपेक्ष सोबतीत, मुलांच्या निष्पाप हास्यात आणि दिवसाच्या शेवटी मिळणाऱ्या मनःशांतीत. जेव्हा आपण क्षणभर थांबून आपल्या आयुष्याकडे पाहतो, तेव्हा जाणवत की आनंद हा बाहेर शोधण्याची गोष्ट नाही; तो तर आपल्या आजूबाजूलाच पसरलेला असतो.

"विश्रांत हा, शांत हा" हे शब्द जीवनाकडे पाहण्याची एक सुंदर दृष्टी देतात. सतत धावणाऱ्या मनाला थोडा विराम मिळाला, अपेक्षांचं ओझं हलकं झालं आणि वर्तमानात जगण्याची कला अवगत झाली की मनाला एक अनामिक शांतता लाभते. त्या शांततेतच जीवनाचा खरा सुगंध दडलेला असतो.

शेवटी, आयुष्याच्या वाटेवर किती दूर आलो, किती मिळवलं, यापेक्षा प्रवास करताना मन किती शांत राहिलं, किती माणसं मनापासून जोडली गेली आणि किती क्षण आपण खऱ्या अर्थाने जगलो, हेच अधिक महत्त्वाचं असतं.
कारण आयुष्याचा खरा आनंद नेहमी मोठ्या क्षणांतच असतो असं नाही... तो कधी एखाद्या गाण्याच्या ओळीत, कधी माणसांच्या सहवासात, तर कधी स्वतःसोबत घालवलेल्या निवांत क्षणांतही अलगद भेटतो.

जीवन म्हणजे केवळ ध्येय गाठण्याची शर्यत नाही, तर प्रत्येक क्षण अनुभवत, नाती जपत आणि स्वतःला शोधत केलेला प्रवास आहे. या प्रवासात मिळालेले सुख-दुःखाचे अनुभवच जीवनाला अर्थ देतात आणि त्यातूनच उमलतो – जीवनाचा तो विश्रांत, शांत आणि आनंददायी गंध.
"मन शांत असेल, तर जीवनातील प्रत्येक क्षण सुगंधित वाटतो."

बागेश्री नाईक





TAYION
COLLECTION

A J DESMOND & SONS
FUNERAL DIRECTORS

Trusted experts
creating custom goodbyes
reflecting love and life.

AJDesmond.com

TROY • CROOKS ROAD
between Maple & Big Beaver
248.362.2500

ROYAL OAK / BIRMINGHAM
WOODWARD AVENUE
between 13 & 14 Mile
Vasu, Rodgers & Connell Chapel
248.549.0500

TROY • ROCHESTER ROAD
between Big Beaver & Wattles
Price Chapel
248.689.0700

memorials | cremation | burial | funerals



Best Wishes
Prakash &
Manda Gandhi

PATEL®
BROTHERS

एक दिवाळी अशीही

संध्याकाळचे ६ वाजले होते आणि दिलीप चरफडतच ऑफिसमधून बाहेर पडला. नेमका दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी Production deployment करायची जबाबदारी त्याच्यावर आली होती. आता एका नोकरीचे दोन माणसांचे टेन्शन आणि त्यातून Visa, Immigration च्या घडामोडींची सततची टांगती तलवार. दिलीपला चाळीशीत पहिल्यांदाच असं वाटायला लागलं होतं की तो हरला आहे, हतबल झाला आहे. डेट्रॉईटच्या Michigan Avenue वरुन त्याच्या Lexus ने शेवटचं वळण घेतलं आणि एकदाचा तो Blackwood Drive वर त्याच्या घरी पोहोचला. ऑक्टोबरचा शेवट होता आणि शरद ऋतूच्या सांजवेळी प्रत्येक घराने हॅलोवीन प्रीत्यर्थ आपल्या अंगणात झाडाला लटकलेले, जमिनीतून वर येणारे सांगाडे लावले होते आणि जोडीला "R.I.P.", "Welcome to Graveyard" अशा पाट्या. त्यामुळे त्याला त्याची अमेरिकेतील आळी फारच भकास वाटत होती. झोपाळ्यावर झुलणाऱ्या हडळी काय, बारा-बारा फूट उंच, लाल डोळ्यांचे सांगाडे काय. दिवाळीच्या सणासुदीला ही काय अवदसा आठवते कोण जाणे म्हणतच दिलीप घरात आला. त्याला त्याच्या दादरमधल्या याच दिवसात लाख लाख दिव्यांनी, आकाशकंदिलांनी सजलेल्या देवकीवाडीची खूप आठवण आली.

दिलीप जरा वैतागूनच सुनीताला, त्याच्या बायकोला म्हणाला, "ऐकलंस का, उद्या नरकचतुर्दशीपासून मी रोज अभ्यंगस्नान करणार आहे आणि पाडवा गिफ्ट म्हणून तुला Bug free production release भेट देणार आहे. चल पटकन जेवायला वाढ आणि झोपू लवकर, उद्या पहाटे पहाटे उठायचं आहे." दिवाळी पाडवा येतोय पण दिलीपने gift काय हवं असं साधं काही विचारलं पण नव्हतं आणि आता त्यात हे release चं लफडं. सुनीताने जरा नाखुशीनेच पानं घेतली. दिलीप, सुनीता आणि त्यांचा ७ वर्षांचा विवान जेवायला बसले. जेवता जेवता विवान बाबाला विचारत होता, "बाबा, what is this ऍभंगनॅन? आणि हे नॉर्कदशी काय असतं?" दिलीपला ते ऐकून एकदम त्याच्या लहानपणीची आठवण आली. पहाटे कडाक्याच्या थंडीत धगधगणारा बंब, काश्याच्या वाटीत काढलेलं कोमट उटणं, आईने तेल लावून घंगाळ्यात वाफाळतं पाणी घेऊन घातलेलं अभ्यंगस्नान, पहिला आपटबार कोण उडवतोय आणि नरकासुराचा वध पहिला कोण करतोय याची आळीमध्ये लागलेली स्पर्धा! दिलीप चटकन भानावर येऊन म्हणाला, "अरे, early morning shower घ्यायचा असतो अभ्यंगस्नान म्हणजे आणि दिवाळीचं celebration नरकासुराचा वध करुन करायचं असतं. कोण होता माहितीये हा नरकासुर? जमिनीतून वर आला होता तो, एकदम danger demon." सुनीता म्हणाली, "रात्रीच्या वेळी उगाच त्याला काहीतरी गोष्टी सांगू नकोस रे, स्वप्न पडतात मग त्याला?" दिलीप जरा वरमून विवानला म्हणाला, "अरे हा नरकासुर होता ना, त्याला ब्रह्माने सांगितलं होतं की तुझी आईच तुला फक्त मारु शकते. आता कोण आई स्वतःच्या मुलाला मारेल म्हणून तो खूप arrogant आणि cruel झाला होता. १६ हजार princesses ना arrest करुन ठेवलं होतं पण श्रीकृष्णांनी त्याच्याशी युद्ध करुन स्वतःच्या बायकोच्या, सत्यभामाच्या, जी भूमातेचाच अवतार होती तिच्या मदतीने त्याचा वध केला म्हणून celebration. नरकासुर म्हणजे Graveyardasur, वराह म्हणजे विष्णूचा boar अवतार आणि भूमाता म्हणजे the Earth goddess चा मुलगा होता आणि जमिनीच्या पोटातून बाहेर आला होता." त्यावर विवान म्हणाला, "ohh म्हणजे Jason uncle च्या front yard मधून तो मोठा skeleton बाहेर येतोय तसा!" सुनीताने order सोडली, "बास झालं तुमचं बाप-लेकाचं, झोपा आता, उद्या पहाटे उठायचंय. एकाला production release ची तयारी करायचीये आणि एकाला शाळेत वेळेवर पोहोचायचंय."

एव्हाना Community मध्ये सगळीकडे सामसूम झाली होती पण Jasonच्या त्या बारा फुटी सांगाड्याची करकर मात्र दोन घरांमधून घुमत होती. दिलीपने झोपायच्या आधी खिडकीतून सगळीकडे एक नजर फिरवली तर त्याला उगाच भास झाला की तो मोठी कवटीवाला सांगाडा त्याच्याकडे बघून भेसूर हसतोय. जसं काही आता जमिनीतून वरच येणारे. त्याच्याकडे दुर्लक्ष करत दिलीप बेडमध्ये गेला आणि कामाच्या दगदगीने गादीवर पडता क्षणी गाढ झोप लागली त्याला. मध्यरात्री नंतर कधीतरी अचानक त्याला ओल्या मातीचा, कुजलेल्या पानांचा कुबट दर्प यायला लागला. त्याने खिडकीतून खाली डोकावून बघितलं तर त्याला असं जाणवलं की Jason च्या front yard ची जमीन भेगाळते आहे आणि भेगांमधून लांब केसाचे सुरवंट भसाभस बाहेर येताहेत. केवढे हे bugs! हिरवळी खालच्या काळ्या चिखलातून मग

हाडकुळी पांढुरकी बोटं बाहेर येताना बघून त्याला धस्स झालं. नखं वाढलेली पण काव्या मातीने भरलेली. मग मनगट, कोपर, मग कवटी असा भला मोठा एक कंकाल बाहेर पडायचा प्रयत्न करत होता. जणू शेकडो वर्षं ओरडायचं राहिलं होतं तसा जबड्याचा आ वासून तो त्याच्या पोकळ डोळ्यांनी इकडे तिकडे बघत होता. हा नरकासुर मेला नव्हता तर अमेरिकेत दिलीपची इतकी वर्षं वाट बघत होता. इथे कोण कृष्ण आणि सत्यभामा येणार वाचवायला असा विचार करुन दिलीप थरथरत्या हाताने खिडकीचा पडदा ओढणार तेवढ्यात त्याला मागून कोणीतरी हाक मारल्यासारखं वाटलं. "दिलीप..." तिरप्या नजरेने बघितलं तर सुनीता उभी. पण ती सुनीता नव्हती. केस मोकळे, भरजरी जांभळा-निळा शालू, कपाळावर मातीचा टिळा, हातात तेलाची बुधली, lighter आणि पणत्यांची माळ. तिच्या डोळ्यात तीच १५ वर्षांपूर्वीची चमक होती जेव्हा भारतातील घरदार सोडून अमेरिकेत यायच्या चिंतेत असताना तिने म्हटलं होतं 'तू टेन्शन घेऊ नकोस, होईल सगळं व्यवस्थित'. दिलीप पुटपुटला, "तूच माझी सत्यभामा!" “उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्।” (स्वतःचा उद्धार स्वतःच करावा आणि स्वतःला कमी लेखू नये) वचन Alexa वरुन सर्व घरात घुमले आणि क्षणात दिलीपचा कृष्ण झाला.

Bug-free production release च्या चिंतेने, Visa च्या टेन्शनने झुकलेला दिलीप नाही तर काळा-सावळा, श्यामसुंदर, सुदर्शन चक्राऐवजी हातात चमचमता दिवा घेतलेला कृष्ण. दिलीप-कृष्णाच्या हातातला एक दिवा पुरणार नव्हता. तेवढ्यात सुनीता-सत्यभामाने त्याच्या हातावर हात ठेवला आणि म्हणाली, "आपण नायनाट करु यांचा."
दिलीपने घराचा दरवाजा उघडला तर स्मिथच्या, पटेलांच्या, डेरेकच्या सगळ्या शेजार-पाजाऱ्यांच्या घरासमोरची जमीन भेगाळत होती, जाड-काळे सुरवंट वळवळत बाहेर पडत होते आणि प्रत्येक भेगातून हाडकुळे हात, लाल डोळे बाहेर यायचा प्रयत्न करत होते. सगळ्या community चं एक प्रचंड स्मशान झालं होतं. माती आता माती राहिली नव्हती, तर थंडीने भेगाळलेली एक कातडी झाली होती आणि त्या कातडीला आता आतून खाज सुटली होती.

पोर्चवरुन खाली उतरुन सुनीता-सत्यभामा जमिनीवर बसली आणि तिने थेट त्या भेगाळलेल्या जमिनीवर, त्या काव्या चिखलावरच पहिली पणती ठेवली आणि वात पेटवली. फस्सकन वात पेटली आणि काय चमत्कार ज्या भेगातून बोटं येत होती, ती भेग प्रकाशाने शिवली गेली. आतून येणारा तो कुबट दर्प जाऊन तुपाचा, तेलाचा सुगंध आला. तीच आता साक्षात भूमाता होती आणि तिला या नरकासुरांना मारण्याचा अधिकार मिळाला होता.

दिलीपला कळलं, दिव्याच्या प्रकाशाने ही अवदसा टळणार आहे. मग ते दोघं धावले. या घरासमोर एक दिवा, त्या झाडाखाली एक दिवा, जॅसनच्या त्या बारा फुटी सांगाड्याच्या पायाशी एक दिवा. प्रत्येक दिवा लावताना सुनीता पुढे आणि दिलीप मागे. प्रत्येक पणतीने आसपासचे सुरवंट आणि अंधार दोन्ही जळून भस्मसात होत होते. जसे जसे दिवे वाढत गेले, तसे तसे ते सांगाडे पण किंचाळू लागले. त्यांची पांढुरकी हाडकं पणत्यांच्या उजेडाने विरघळून जायला लागली. त्यांची करकर बंद झाली. अख्खी आळी लखलखू लागली, खरी “दिवाळी” आता चालू झाली होती. डेट्रॉईटच्या Blackwoodची ती भकास वाटणारी गल्ली एकदम दादरच्या देवकीवाडीसारखी दिसायला लागली. आता सगळ्यात शेवटी उरला होता तो मोठा, जॅसनच्या अंगणातला मुख्य नरकासुर. तो अजूनही अर्धा जमिनीत, अर्धा बाहेर. त्याने वर आ करुन जबडा वासला होता. दिलीपने शेवटचा दिवा त्याच्या कपाळावरच ठेवला. जसा दिवा ठेवला तसा तो Graveyardasur फुटला, फुस्स करुन.

दिलीप जागा झाला. घामाने थबथबलेला. घड्याळात पहाटेचे ४:३०. बाजूला सुनीता जागी होती आणि खिडकीतून बाहेर जॅसनच्या front yard कडे बघत होती. दिलीप ताडकन उठला. सुनीताचा हात हातात धरला आणि म्हणाला, "चल!" सुनीता म्हणाली, "कुठे? वेडा झालायेस का? साडेचार वाजलेत पहाटेचे." तो म्हणाला, "नरकासुराला मारायला. तू सत्यभामा आहेस ना, भूमाता. तुझ्याशिवाय मरणार नाही तो. तू तेल-वाती तयार ठेव, मी पणत्या घेऊन येतो." सुनीताला काहीच कळेना, पण त्या चाळीशीतल्या हरलेल्या नवऱ्याच्या डोळ्यात आज एवढ्या दिवसांनी तिला उत्साह दिसत होता. ती काही न बोलता किचनमध्ये गेली. तेल, वाती, छोट्या पणत्या भरुन दोन ताटं तयार केली.

दोघांनी मिळून बाहेरच्या लॉनवर, फुटपाथवर, जॅसनच्या सांगाड्याच्या शेजारीच, एक एक दिवा लावायला सुरुवात केली. ऑक्टोबरच्या कडाक्याच्या थंडीत पहाटे चार वाजता, डेट्रॉईटच्या एका छोट्या आळीत दोन मराठी माणसं Graveyard-नरकचतुर्दशी साजरी करत होते. जसे घराभोवती दिवे लागले तसा भकासपणा गेला. आता ते बारा फुटी सांगाडे भेसूर वाटेनात. दिव्यांच्या प्रकाशात ते फक्त प्लास्टिकचे बाहुले वाटत होते. इतक्यात मागून विवान आला. डोळे चोळत.म्हणाला, "आई, बाबा, तुम्ही हे काय करताय? हे ऍभंगनॅन आहे का?" दिलीपने त्याला उचलून घेतलं. म्हणाला, "इतक्या वर्षांनी नरकासुर पहिला आम्ही मारला. बघ, केवढ्या पणत्या लावून लखलखाट केलाय आणि किती Graveyardaसुरांना मारलंय." विवानला काहीच कळत नव्हतं.

सुनीता हसत हसत त्याला म्हणाली, "कृष्णाने नरकासुराला मारलं, हे खरं. पण दानशूर बळीराजाला पाताळलोकांतून वर कोणी आणलं माहितीये? विंध्यावलीने. त्याच्या बायकोनेच. महाबळीराजाने वामनरुपी विष्णूला स्वतःकडचं सगळं देऊन टाकल्यावर आता द्यायला काहीच राहिलं नव्हतं तर स्वतःच्या डोक्यावर त्याला पाय ठेवायला सांगून पाताळात कडेलोट करुन घेतला. त्यावर ती पतिव्रता विष्णूला असं नाही म्हणाली की तू त्याला पाताळातून वर काढ, तर ती म्हणाली माझा नवरा जिथे असेल, तिथे जायचा वर मला दे. तिच्या पतिप्रेमावर खुश होऊन तिला पाताळलोकाचा त्रास नको म्हणून विष्णूने दिवाळीच्या पाडव्याला, कार्तिक शुद्ध प्रतिपदेला एक दिवस महाबळीला पाताळलोकांतून वर यायची परवानगी दिली. म्हणूनच पाडव्याला बायको नवऱ्याला ओवाळते आणि नवरा बायकोला भेटवस्तू देतो."

दिलीपने चमकून सुनीताकडे बघितलं. त्याला कळलं, भारत सोडून तो जिथे जाईल तिथे त्याच्याबरोबर जाणाऱ्या या विंध्यावलीला Production deployment च्या, Visa कटकटीच्या पाताळलोकांतून एक दिवस बाहेर येऊन एखादं gift देणं हे त्याचं कर्तव्य आहे. सकाळ झाली तेव्हा शेजारी जॅसन बाहेर आला. दिवे बघून म्हणाला, "Wow, Diwali lights? Beautiful! Can I keep some for my skeleton, that guy looks cool with your lights?" दिलीप हसला. सुनीता पण हसली आणि दोघेही एकदम म्हणाले, "Of course!" त्यानंतर संध्याकाळी Blackwood स्ट्रीटवर दोन दिवे लागले. एक नरकासुराला मारण्यासाठी आणि एक बळीला परत आणण्यासाठी.

दिलीपला त्या रात्री कळलं, चाळीशीत प्रत्येक पुरुषाचा श्रीकृष्ण, बळीराजा होतोच. सगळं असूनही तो पाताळात जातो. सर्व शक्तिमान असूनही काही problems पुढे हतबल होतो. म्हणूनच प्रत्येक बळीला एक विंध्यावली लागते जी दिवा घेऊन त्याच्या मागे पाताळातही येते. श्रीकृष्णाला सत्यभामा लागते जी अशक्यप्राय संकटावर मात करायला मदत करते. दिलीपच्या आयुष्यात ती सत्यभामा-विंध्यावली सुनीता होती.



इडा पिडा टळो, आणि बळीचं राज्य येवो. Happy Diwali and Happy (?) Halloween!
तळटीप : हिंदू असो वा ख्रिश्चन, मेक्सिकन, अमेरिकन असो व भारतीय, लोकांच्या भूत, पिशाच्च, दानव-असूर, देव, देवी संकल्पना त्याच पण त्याच्याकडे बघायचा दृष्टिकोन वेगळा. एकाला वाटते भूत पिशाच्यांनी त्रास देऊ नये म्हणून आपण त्यांचातलेच असल्याचे भासवायचे तर दुसऱ्याला वाटते Oct - Nov मध्ये दाटून येणाऱ्या अंधारावर दिव्यांच्या रोषणाईने मात करावी. पुलंनी म्हणल्याप्रमाणे
फरक फक्त दृष्टिकोनाचा आहे, "मराठीला जी 'मज्जासंस्था' वाटते, तीच इंग्रजीला 'Nervous System' वाटते. फरक फक्त दृष्टिकोनाचा आहे!"

अभिजित जोगदेव
Detroit , USA
ऑक्टोबर २७, २०२६

Graham & Ketkar, PLLC

Immigration Law Expertise
Supporting corporate employees and their families



Veg O Rama

dwarkamai
KITCHEN

Contact: 734-776-8492 5063 LIVERNOIS ROAD TROY MI 48098
VORTroy_DMK5063@gmailcom

FORTUNE FOREVER

FINANCIAL SERVICES









Best Wishes from

SENSORY
REHABILITATION

4413 Reilly CT Troy 48085 • +1 (248) 719 - 4827
SENSORY REHABILITATION
rehabsensory1@gmail.com

ABOUT US

Healthcare industry works tirelessly to provide exceptional care to everyone in need while facing many challenges. Challenges related to staffing, in particular, have become complex over the years and this is why Sensory Rehabilitation, LLC was established in 2017.

We work to create and develop a supplemental workforce consisting of motivated, talented, and highly-qualified professionals who meet the needs of your patients and facility. We really focus on getting to know you and your organization prior to delivering a provider who is right for both you and your patients.

WHY CHOOSE US?

- 8 YEARS IN HEALTHCARE STAFFING SERVICES.
- FOSTER A CULTURE OF CARE, TRUST, HONESTY, RESPECT, AND BENEVOLENCE.
- PLACEMENT IN HOMECARE AS WELL AS OUTPATIENTS SERVICES.
- MORE THAN 25+ H1 APPROVAL AND 5 GREEN CARD APPROVALS.



Best Wishes From

RASNA

FOODS

The Whisper

I decided to go for a walk. It was late, but I did not want to sit at home anymore. I was just retired this Monday, today was Thursday and I was already done. There was only so much cleaning or repairs I would do. The wife suggested that we would go out for dinner, I said sure, but after my walk. I wanted to clear my head and a smoke would help. Previously I would smoke at work but now I had to make occasions.

I walked a good bit and then lit my smoke stick, drew a big inhale and kept walking. As I passed a bunch of bushes in the darkening sky, I heard someone whisper my name. I had not heard that voice before. But it was very alluring. Peaceful, like the low ring of an ice-cream truck that you know will have a treat for you.

I turned into the bushes and kept walking. I heard it again. This time, almost certainly from the bush on the right. I threw the cigarette away. That was not a conscious decision. I actually had a contradicting thought about why I threw it away, it still had a good three puffs left. But overall I did not care. I wanted to hear the whisper again. It held promise.

I trailed through the row of bushes, down a slope. There was a slight gap, and then I was surprised to see rumble strips that went on. Sounds of tires, a really loud horn.

Reghu Neelakanthan



महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

Maharashtra Mandal of Detroit

PEOPLE | CULTURE | COMMUNITY | FOREVER

Our Roots... Our People... Our Detroit Family...

50 YEARS GOLDEN JUBILEE 1977 – 2027

MMD 2027 MEMBERSHIP

Celebrating 50 Years of Culture, Community & Connection

September 11-12, 2027
Two Spectacular Days

Detroit, MI

WHY JOIN MMD 2027?

Five Signature Programs
Sankrant | Gudhi Padwa | Picnic
Kojagiri | Diwali

Member Discounts
Natak & special events
Movie screenings

Education & Enrichment
Rasika (local talent), Health & Wellness, Sports, Volunteering and more

Be Part of a Historic Milestone!
More than membership...
It's a family for life!

MEMBERSHIP (2027)

Membership Type	Price
Student	$50
Single	$75
Single + Child	$90
Single + 2 Children	$105
Couple	$130
Couple + 1 Child	$145
Couple + 2 Children	$160
Couple + 3 Children	$175

Scan QR to get your membership TODAY

50 YEARS GOLDEN JUBILEE 1977 - 2027

Maharashtra Mandal of Detroit
GOLDEN JUBILEE (2-DAY EVENT)

Same Sanskriti Stronger Together

EVENT HIGHLIGHTS

- Grand Opening Ceremony from Detroitkars
- Special Programs from India
- Multiple Programs from North America
- Dhol Tasha & Grand Miravnuk
- Food, Fun & Networking
- Reconnect with our Community
- 1,100+ Attendees
- Music | Food | Culture | Fun

September 11-12, 2027
Two Spectacular Days

Detroit, MI

Special 2026 Price (with 2027 Membership at MMD Diwali Event)		
Category	Adult	Kids
Premium	$150	$95
Standard	$125	$89
Balcony	$100	$65

Special MMD Member Price 2027		
Category	Adult	Kids
Premium	$175	$105
Standard	$150	$90
Balcony	$125	$75

Non-Member Price		
Category	Adult	Kids
Premium	$200	$125
Standard	$175	$100
Balcony	$150	$75

Scan QR to register & learn more

Our Bronze Sponsors

VIRASAT
THE HERITAGE
INDIAN CUISINE

SUGUNA'S
Beauty Touch

Roshan Pathre
Real Estate Agent

SAMI'S
ENGRAVING
& GIFTS

V2SOFT
Innovation Through Intelligence.

Taal Academy

Best Wishes
from
Sheetal Sonar

DME
presents

Gold
Adventures

Pande
GROCERS

THE TUTORING CENTER

Best Wishes
from
Kiran &
Deepa Ingle

Our Bronze Sponsors

CENTURY 21 Town & Country



Paradise BIRYANI POINTE

GLOWING SMILES DENTAL

Sabrina's SALON

Yummy In Tummy with Saroj

Best Wishes from Prem Khilnani

EXPERIENCE THE LIFE MI ADVENTURES'23

Best Wishes from Hema & Deodatta Kulkarni

Gamak academy


North Indian Classical, Semi-Classical Vocal Music

Ashoka Indian CUISINE

कृष्णा

परवाच कुणीतरी WhatsApp वर रांगोळीचा फोटो फॉरवर्ड केला होता.कृष्णाची बासरी वाजवतानाची ती सुंदर रांगोळी होती. रांगोळीच्या वर लिहिले होते "श्री कृष्णाय नमः".कृष्ण म्हटल्यावर एक जुनी आठवण जागृत झाली. ह्या गोष्टीला आता तीसपेक्षा जास्त वर्षे झाली असतील.

मी नेहमीप्रमाणे मुंबईला बहिणीला फोन लावला. लगेच excitement मध्ये तिने चालू केले, "अग शमा, काल काय धम्माल झाली माहित आहे?" आपल्या CNN च्या जशा सर्व news ब्रेकिंग news असतात, तसं माझ्या बहिणीची प्रत्येक गोष्ट "धम्माल झाली" नेच सुरु होते. "काय लवकर सांग. हा इंटरनॅशनल कॉल आहे, मीटर पटकन वाढतो." पण ही गोष्ट मात्र खरंच धम्माल होती. तिच्याच शब्दात सांगते



अग काल ना मी मुलांच्या शाळेच्या admissions घ्यायला गेले होते. तिकडे एवढी मोठी रांग होती आणि त्यात मरणाची गर्मी. पण नंबर येईपर्यंत रांगेत उभे राहणे याशिवाय उपाय नव्हता. तरीसुद्धा माझ्या पाठच्या बाईबरोबर गप्पा मारुन टाईम पास करत होते. इतक्यात एक विशीतला मुलगा माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला, "बाई, तुम्हाला साहेबांनी आत बोलावलं आहे." मी त्याला विचारले, "कशाला बोलावले आहे माहित आहे का?" तर तो काही बोलला नाही. मनात विचार करीत होते, कोण हा त्याचा साहेब आणि कशाला मला आत बोलावलं असेल? ह्यांच्याबरोबर जावं तर आपला नंबर जायचा. आणि पुन्हा येऊन ह्या लांब रांगेत उभं राहायचं म्हणजे admissions ची खात्री नाही. पण ती मागची गप्पा मारणारी बाई म्हणाली, "जा, तुम्ही जाऊन या. मी तुमचा नंबर ठेवते." मी तिला थँक्यू म्हटलं आणि त्या मुलाबरोबर चालू लागले.

त्या मुलाने मला शाळेतल्या एका ऑफिसमध्ये नेले. तिथे एक सावळ्या वर्णाचा मनुष्य हात जोडून हसत उभा होता. मला पाहून तो म्हणाला, "बसा. अमलमाई, मला ओळखलंत का?" मी म्हटलं, "चेहरा परिचयाचा वाटतो पण नाही लक्षात येत." त्यावर तो म्हणाला, "मी कृष्णा. माझी आई आनंदी तुमच्याकडे काम करायची आणि तुमच्या आईनेच मला शाळेत घातला. आणि त्याच माझी फी भरायच्या. आमच्याकडे पाणी येत नव्हतं तेव्हा आम्ही तुमच्या बाथरुममध्येच अंघोळ करायचो आणि प्यायचं पाणी पण तुमच्याकडूनच न्यायचो."

